क्र.पीए/एसआर/४१/२०२०,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
दिनांक :- २९ मार्च २०२०.

प्रति,

जिल्हा पोलीस अधीक्षक,
कोल्हापूर.

विषय :- कोल्हापूर जिल्हयाबाहेरील व्यक्ति, संस्था व लोक प्रतिनिधी यांच्याकडून संचारबंदी आदेशाचे उल्लंघन करुन जिल्हयाबाहेरील व्यक्तिंना जिल्हयात बेकायदेशीर प्रवेश करण्यासाठी पत्रे देण्याच्या कृती विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत.

संदर्भ :- १)इकडील आदेश क्र.कार्या-७/गृह/पोल/एसआर-०५/२०२०, दि.२२/३/२०२०.
२)इकडील आदेश क्र.नैआ/कोरोना विषाणू/७८९/२०२०, दि.२३/३/२०२०.

माझ्या असे निदर्शनास आले आहे की, मागील ३ ते ४ दिवसापासून कोल्हापूर जिल्हयाबाहेरील अशासकीय व्यक्ति, संस्था व लोक प्रतिनिधी हे कोल्हापूर जिल्हयाबाहेरच्या व्यक्तिंना पुणे, मुंबई व इतर ठिकाणाहून कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रवेश देण्यासाठी संचारबंदी आदेशाचे उल्लंघन करुन पोलीस अधिकारी त्याचप्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पत्रे देत आहेत व त्यामुळे कोल्हापूर जिल्हयाचे हददीत पोहोचे पर्यन्त सर्व जिल्हयाचे तपासणी नाके पार करुन परजिल्हयातून येणा-या व्यक्तिंना कोल्हापूर जिल्हयामध्ये येण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे. यामुळे संचारबंदी व जिल्हा बंदी आदेशाचे उल्लंघन होत असून हजारोच्या संख्येने येणा-या बाहेरील व्यक्तिंमुळे कोल्हापूर जिल्हयातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा फार मोठा प्रश्न निर्माण होत आहे. संचारबंदी आदेशाचे उल्लंघन करुन वाहने तसेच व्यक्तिंना घराबाहेर पडण्यास व बेकायदेशीररित्या कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रवेश करण्यास प्रवृत्त करण्याने कोल्हापूर जिल्हयाच्या ठिकठिकाणच्या हददीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याचप्रमाणे जिल्हा बंदीचे उल्लंघन होऊन बाहेरील व्यक्तिंव्दारे जिल्हयात कोरोना विषाणू संसर्ग जिल्हयातील नागरिकांमध्ये पसरण्याचा फार मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा व्यक्ति विरुध्द फौजदारी कारवाई करणे आवश्यक आहे व संचारबंदी आदेशाचे उल्लंघन थांबविणे आवश्यक आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सबब कोल्हापूर जिल्हयाबाहेरील ज्या अशासकीय व्यक्ति, संस्था किंवा लोक प्रतिनिधी यांनी संचारबंदी आदेश लागू झाल्या पासून जिल्हयात प्रवेश करण्यासाठी दिलेली पत्रे संबंधीतांकडून जप्त करावीत व अशी पत्रे देऊन संचारबंदी आदेशाचे उल्लंघन करण्यास कारणीभूत ठरणा-या संबंधीतां विरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ त्याचप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन कायदयातील तरतुदी प्रमाणे फौजदारी गुन्हे दाखल करावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

( दौलत देसाई )
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
कोल्हापूर

Scanned with CamScanner